दै. गोदातीर

# मंदिरातील दानपेटी फोडणाऱ्या दोन चोरट्यांना अटक



**नायगाव बाजार–** मांजरम येथील महादेव मंदिरातील दानपेटी फोडणाऱ्या चोरट्यांना नायगांव पोलिसांनी ४८ तासांच्या आत अटक केली. त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे.

अनेक वर्षांपासून नायगांव शहरासह नायगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चोऱ्यांचा तपास लागत नव्हता. नायगाव पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न चिन्ह लागले होते.

त्यातच दि. १० सप्टेंबर रोजी चोरट्यांनी तालुक्यातील मांजरम येथील महादेव मंदिराची दानपेटी फोडून अंदाजे ३० हजार रुपये लंपास केले. सुभाष बोमनाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला. पण या घटनेच्या काही दिवसांपूर्वीच नायगावात नव्याने आलेले पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी या घटनेचा तपास सुरु केला. पोलीस निरीक्षक कुंभार यांनी एक पथक तयार केले. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीवरून आरोपी बाजीराव गोविंदराव शिंदे (वय ३२), गोविंद विठ्ठल शिंदे,(वय३६), शरद धनराज शिंदे (वय २२) यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. या चौकशीत तिन्ही आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच त्यांच्याकडून १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांना नायगांव येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तिन्ही आरोपींना न्यायालयीन कोठडी दिली आहे.

पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पंडित, पोलीस उपनिरीक्षक भिमराव कदम, पोहेका गणपत पेंदे, बाबुराव चरकुलवार, बालाजी शिंदे, बालाजी बामणे नायगांव पोलिसांनी ४८ तासाच्या आत तपास लावल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस उपअधीक्षक संकेत गोसावी यांनी कौतुक केले आहे.

दै. देशोन्नती-

# मांजरम येथील मंदिरातील दानपेटी फोडणाऱ्या तीन जणांना अटक

देशोन्नती वृत्तसंकलन



**मांजरम :** येथील शेषेराव व्यंकटराव मंगनाळे यांच्या गट क्रमांक १ मधील महादेव मंदिरातील ९ सप्टेंबरच्या रात्री चोरट्यांनी दानपेटी फोडून पैसे घेऊन फरार झाले होते. दरम्यान पोलिसांनी शोध घेवून मंदिरात चोरी करणाऱ्या तिघांना अटक केली आहे.

मांजरम येथील महादेव मंदिरातील दानपेटी फोडून भाविकांनी टाकलेली देणगी चोरट्यांनी लंपास केली. दरम्यान पंडित हावगीराव मंगनाळे. हनुमंत शिंदे. संदीप शिंदे यांनी याबाबत नायगाव पोलिसात तक्रार दिली होती. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पो. नि. अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली येथील पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पंडित व पो. कॉ. बालाजी शिंदे यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून बाजीराव शिंदे यांना विश्वासात घेऊन महादेव मंदिराच्या त्या चोरीबाबत विचारपूस केली असता गोविंद विठ्ठल शिंदे व शरद धनराज शिंदे यांच्यासह मी चोरी केले आहे, असे कबूल झाले आहेत. त्या दोन्ही आरोपीला तब्ताब्यात घेऊन त्यांना विचारपूस केली असता त्यांनी ही चोरी आम्ही केली असे कबूल केले आहे. त्यांच्याकडून १२६० रुपयाचे चांदीचे दागिने व १४०९ रोख रक्कम एकूण १५३५० त्यांच्याकडून जप्त करण्यात आले. सदरील आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.(वार्ताहर)